Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- IX SEPTEMBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# प्राचीन भारताच्या राजकारणाचे मूल्यमापन

**डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख.

प्राचीन भारताच्या राजकारणाचे मूल्यमापन करीत असताना वैदिक, शांती पर्व कौटिल्याचे अर्थशात्र व शुक्रनीती अशा ग्रंथाच्या साह्याने भारताच्या प्राचीन राजकारणाचा, व राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केला जातो. आणि त्या आधारावर त्याचे मूल्यमापन आणि निष्कर्ष काढले जातात. प्राचीन भारताच्या राजकारणाचे मूल्यमापन विषयावर शोध निबंध लिहत असताना ऐतेहासिक पध्दतीचा अभ्यास करून काही गृहितके समोर ठेऊन शोधनिबंध पूर्ण करण्यात आला आहे.

१] विश्वातील राजकीय विचार ग्रीसपासून म्हणजेच प्लेटो ऑरिस्टोटल यांच्यापासून प्रथम सुरु झळा आहे. या वाद्यावरून प्राचीन भारतीय राजकारणाचा पाश्चिमात्य, घार्जिणेपणा व पोकळपणा लक्षात येतो. कारण प्राचीन भारतातील विचार लिखित करण्याची व ती जतन करण्याची भारतात कोणतीच पद्धत नव्हती त्यामुळे अनेक जुने ग्रंथ हे समोर आलेच नाहीत आणि जे प्राचीन ग्रंथ आपल्याकडे आज उपलब्ध आहेत. ते कोणत्या काळातील आहेत ते निश्चितपणे सांगता येत नाहीत. कौटिल्याच्या अर्थशास्त्राची अधिकृत प्रत आपल्याकडे १९०९ मध्ये प्रसिद्ध झाली जर प्राचीन भारतातील राजकीय विचारावर येणाऱ्या काळात संशोधकांनी संशोधन केलेतर अनेक प्राचीन भारतीय ग्रंथ उपलब्ध होतील आणि त्यामुळे प्राचीन भारतीय राजकीय विचारावर प्रकाश पडेल.

२] प्राचीन भारतात अनेक राजकीय विचार किंवा विचारप्रणाली ह्या अस्तित्वात होत्या लोकशाही,राजेशाही,महाजनसत्ता,व गणराज्य व अनेक प्रकार प्राचीन किंवा मध्ययुगीन काळात नष्ट झाले. पण राजेशाही हा शासनप्रकार हा कायम स्वरूपी टिकला आणि राजेशाही हा राजकीय विचार भारताप्रमाणेच जगामधील अनेक देशात पण टिकून होता, गणराज्य शासनप्रकार ग्रीस व इटली सारख्या देशात अस्तित्वात होते त्यामुळेच प्राचीन काळातील राजकीय विचाराचे मूल्यमापन करताना भारतात जे राजकीय विचार प्राचीन काळापासून अस्तित्वात होते .त्याचे मूल्यमापन संशोधकांनी संशोधन करीत असताना केले आहे. आणि त्या विचार प्रणालीतील दोष नष्ट करून विचारातील तत्व व मूल्य जे सर्वमान्य आहेत ते स्वीकारण्यात आले आहेत.

३] प्राचीन भारतातील राजकारणावर अशी टीका केले जाते कि प्राचीन भारतीय राजकारणामध्ये समानता व कायद्या समोर समता हे तत्व सर्वमान्य झाले होते. कारण प्राचीन काळात भारतात राज्य हे वर्णाश्रम धर्मआनुसार काम करत होते काही जातीच्या लोकने विशेषाधिकार होते. त्याकाळात भारतात जन्मनुसार व्यक्तीला काम आणि स्थान प्राप्त व्हायचे धर्म हा प्राचीन भारतीय राजकारणाचा आधार होता. भारतीय समाजात जातीवाद रूढ होता आणि तो सर्वमान्य पण होता. त्यामुळेच समानतेऐवजी विषयामातेवर राज्यवस्था आधारित होती भारताप्रमाणेच जगातील अनेक राष्ट्रात विषमता होते भारताप्रमाणेच या देशात सामंत व कायद्याचे राज्य नव्हते. ग्रीस नागरराज्याच गुलामांना आणि स्त्रीयांना कोणतेही अधिकार नव्हते.

४] राज्य किंवा राजकीय व्यवस्थासाठी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली होती. राजाने कसे वागावे,त्याची दिनचर्या कशी असावी,त्याने काय शिकावे,लोकांचे रक्षण, मनोरंजन,पालनपोषण,कसे करावे असे अनेक बंधने प्राचीन काळात राजावर लादण्यात आली होती. राजा हा कायदा व धर्मपेक्षा मोठा नव्हता. लोकांच्या कल्याणासाठी राजाने स्वतःचा सुख व आनंदाचा त्याग केला पाहिजे,धर्म, निती,न्यायासाठी काम केले पाहिजे, कायदा व सुव्यवस्था टिकवणे हे राजाचे मुख्य काम होते,सामान्य

लोकांपेक्षा राजावर जास्त बंधने होते.जर राजाकडून गुन्हा किंवा अपराध झाल्यास त्याला पण शिक्षा होत होती. राजपद हि संस्था दैवी होती पण राजा हि व्यक्ती दैवी नव्हती. राजाला जे अधिकार त्या काळात झाले होते. ते आधिकार स्वतःसाठी नव्हते तर राजपद ग्रहण केल्यानंतर राजपदाची कर्तव्य पार पाडण्यासाठी हे अधिकार होते. इंग्लंडमध्ये असे म्हणाले जात होते कि राजा कधीच चूक करू शकत नाही किंवा तो चुकत नाही. अशी पाश्चिमात्य कल्पना प्राचीन भारतीय राजकारणात आढळत नाहीत. राजासाठी अनेक मार्गदर्शक तत्वे सांगण्यात आली होती पण राजा या मार्गदर्शक तत्वाचे पालन करीत होता का असा प्रश्न ज्यावेळी विचाराला जातो तेव्हा यांचे नकारात्मक उत्तर मिळायचे कारण राजाचा आदेश सर्वांना मान्य करावाच लागायचा,राजा हा त्याकाळी सर्वश्रेष्ठ होता. राजाचा आदेश न मानणाऱ्या व्यक्तीला जबर शिक्षा दिली जात होती. कारण अनियंत्रित राजेशाहीमुळे राजाची एकाधिकारशाही किंवा जुलूमशाही त्या काळात होती आणि अशी एकाधिकारशाही सहन करण्या पलीकडे लोकांकडे दुसरा पर्याय नव्हते. राजाला शिक्षा किंवा दंड करणारी सर्वश्रेष्ठ व्यवस्था नव्हती असे अनेक दोष प्राचीन भारतीय राजकीय व्यवस्थेत होते.

५] राज्ये थोडी मोठी होऊ लागल्याबरोबर प्राचीन भारतात विकेंद्रित राज्य व्यवस्थेची प्रक्रिया सुरु झाली. ग्रामपंचायतींना विविध अधिकार प्राप्त झाले . करवसुली विकेंद्रित पद्धतीने होऊ लागली व काही ठराविक हिस्सा राज्याच्या खजिन्यात न्यायपद्धती लिखित नसल्याने परंपरेनुसार न्यायदान होऊ लागले. झगडेही फारशा गुंतागुंतीचे नसत आणि वादी-प्रतिवादी माहितीतलेच असत. माढयावरती राज्यसत्तेला इकडे लक्ष्य देण्यास वेळ नव्हता, दळणवळणाची वेगवान साधनेही उपलब्ध नव्हती. तशी व्यवस्थाही नव्हती व गरजही वाटत नसावी. यातूनच मग राज्य कोण करतो यांच्याशी प्रजेला फारसे कर्तव्य उरले नाही ;मध्यवर्ती राज्यसत्तेशी सर्वसामान्य माणसाचा संबंध तुटला. धार्मिक कर्मकांडे, स्थानिक गावगाड्यांचे नियंत्रण, जातीभेद,यात प्रजाजन रुतून बसले. साम्राज्ये आली आणि गेली, परक्यांच्या स्वाऱ्या आल्या आणि त्यांनी देश पादाक्रान्त केला तरी मोडक्या ग्रामसंस्थेंच्या आधारे समाजजीवन संथच राहिले. ते कधी हादरले नाही कि जागृत झाले नाही.

६] प्राचीन भारतातील राजनीतीवरील ग्रंथ प्रत्येक राजाला राज्यविस्ताराची प्रेरणा देतात. राज्यविस्तार कशासाठी करावयाचा त्याबद्दल स्पष्ट खुलासा नाही. धर्म-प्रसारासाठी म्हणावे तर जवळजवळ सरावांचा धर्म एकच होता. राज्यविस्तारामागे काही तत्वन्यानही नहव्ते. बरे,राज्य जिंकल्यावर ते आपल्या प्रदेशात पूर्णपणे विलीन करावे असाही आग्रह नाही. उलट ते राज्य तिथलाच कोणाला तरी देऊन प्रजेला पूर्वीप्रमाणे राहावयास सांगून आपण परत यावे, असा आग्रह आढळतो. म्हणजे लढाई करून फायदा काय तर थोडीफार खंडणी, नजराणे, भेटी, एखादा विवाह. मग तो राजाही गप बसत नसे. त्यानेही वेळ पाहून वचपा काढलाच पाहिजे हा त्याचा धर्मच. म्हणजे राजे अनेक,लढायाही अनेक, पण स्थिर , एकछत्री सामराज्य कोणाचेच नाही , अशी अवस्था झाली. दुसऱ्याचा पराभव करावयाची सर्वनाच प्रेरणा व समान संधी, युद्धही आवश्यक, युद्धसजता अनिवार्य, युद्धे अगणित , तह अनेक , असंख्य विजीगीषु , अफाट अरी आणि अरिमित्र, सारख्या लढाया छात्र मार्गीशिषार्था चालू. पण स्थिर, देशाच्या मोठ्या भागवर एकछत्री अम्मल गाजविणारा केंद्रशासित, बलवान अशी दीर्घकाळ राज्ये संपूर्ण इतिहासात हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच. काही राजे सामर्थ्य थोडे वाढले म्हणजे अश्वमेध यश करीत. त्यातून निष्पण एवढेच होई कि घोडा अडविला कि लढाई,घोडा अडविला नाही कि शरणागती स्वीकारली असे समजून त्याच्या राज्यास काही हात न लावता पुढे सरकणे; घोडा परत आला कि स्वतःस चक्रवर्ती सम्राट म्हणवून धावायचे व दुसऱ्याच्या घोडयाची वाट पाहत बसवायचे.खऱ्या अर्थाने प्रचंड भूप्रदेशाला एकत्र बांधणारे, एकजीव सामराज्य अगदी कदाचितच झाले. निश्चित हेतुशून्य राज्यविस्ताराच्या प्रेरणेमुळे क्रमाक्रमाने सर्वच राज्ये खिळखिळी झाली आणि परक्यांचे फावले. परक्यांच्या आक्रमणासमोर संपूर्ण देश एकवटून उभा राहिला अशी द्रिश्य अपवादात्मक. वरील परिस्थितीमुळे भोगोलिक, धार्मिक

व संसकृतिक एकता असूनही भारतात राजकीय ऐक्य व बलवान केंद्र सरकार स्थापन होऊ शकले नाही.

युद्धे सारखी चालत आणि त्यांत सैनिक प्राणपणाने शौर्याने लढत, पण त्यात आपल्याला राज्याबद्दल व राजाबद्दल निष्ठा एवढीच प्रेरणा होती. याला खऱ्या अर्थाने देशभक्ती म्हणता येणार नाही. अशा युद्धांमुळे शौर्यधरयादी गन वाढीस लागत असतील यात शंका नाही, पण राज्य जिंकले तरी तेथील प्रथा,परंपरा, संस्कृती , राजपद , समाज-रचना यांत काहीच फरक न करता परत यावयाचे हा निष्कारण शक्तीत्वाच नाही का ? त्यामुळे राज्यातील प्रजाहि राज्याचा पराजय गंभीर संकट मानीत नसे; कारण त्यांच्या दैनंदिन जीवनात काहीच फरक पडणार नव्हता. विजय झाला तरी काही मोठा फायदा होणार नव्हता.

**संदर्भसूची-**

१] भास्कर लक्ष्मण भोळे - राजकीय सिद्धांत , पिंपळापुरे अण्ड क. पब्लिशर्स, नागपूर.

२] दिगंबर खेडेकर - राजकीय सिद्धांतील मुलभुत संकल्पना , चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३] भास्कर लक्ष्मण भोळे - राजकीय विशलेषण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर.

४] पा. श्री. घारे- राज्यशास्त्र ( सिद्धांत आणी राज्ययंत्रणा ) पुणे विध्यार्थी प्रकाशन ,पुणे ३०.

५] संतोष पाटील - राजकीय विचारप्रणाली ,शुभम प्रकाशन विठ्ठल नगर, लातूर.